विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परीक्षेच्या (PRE) जुन्या नियमावलीमध्ये बदल/दुरूस्ती/सुधारणा करणेबाबत....

# महात्मा फुले कृषि विद्यापीठ
# राहुरी, जि.अहिल्यानगर

विद्यापीठ निर्णय जा.क्र.एमटीजी-२ (९२)/१४३ /२०२५ दिनांक-२४/०६/२०२५

**वाचा:-** १. विद्यापीठ निर्णय क्र. एमटीजी-२(९२)/३५७५/८२, दिनांक १४ जुलै, १९८२.

२. शासन निर्णय क्रमांक:विपधो २६२०/प्र.क्र.१६/का.१७, दिनांक ३१ मार्च, २०२१.

३. कार्यकारी परिषद टराव क्र.७३/का.प.बै./३४२ (०७.०१.२०२५)

४. उप-कुलसचिव (प्रशासन) यांची टिपणणी क्र. जा.क्र./प्रशासन-ड/सेप्रप(PRE)/सुधारणा/टराव/१६५६ /२०२५, दिनांक ०८/०५/२०२५

**पार्श्वभुमी**

उपरोक्त संदर्भ क्र. १ नुसार विद्यापीठ अधिकारी/कर्मचारी यांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा लागू करण्यात आलेली आहे. त्यानंतर वेळोवेळी विद्यापीठ निर्णय/परिपत्रकाव्दारे सेवा प्रवेशोत्तर परीक्षेच्या नियमांमध्ये सुधारणा करण्यात आली. त्यानुसार, विद्यापीठ निर्णय/ परिपत्रकांमधील परीक्षेबाबतच्या नियमांप्रमाणे आजपर्यंत कार्यवाही करण्यात येत आहे. सदर नियमावली जुनी असल्याने, सद्यस्थितीमध्ये परीक्षेसंबंधीच्या कामकाजात अडचणी निर्माण होत आहेत.

दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयामधील परिक्षांसंदर्भातील सामाईक बाबींचे धोरण केवळ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांनाच लागू राहील. हे धोरण जिल्हा परिषदा/नगरपालिका/महानगरपालिका/शासनाच्या अधिपत्याखालील मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे/अन्य निमशासकीय आस्थापनेवरील कर्मचारी यांना लागू होणार नाही, असे नमुद करण्यात आलेले आहे.

तथापि, दिनांक ३१ मार्च, २०२१ रोजीच्या शासन निर्णयामधील काही तरतूदी परिक्षेसंदर्भातील नियमावलीमध्ये लागू केल्यास विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परिक्षेच्या नियमांमध्ये सुधारणा होऊन परिक्षेसंबंधीचे कामकाज सुरळीत पार पाडण्यात मदत होईल.

**विद्यापीठ निर्णय:**

**सद्यस्थितीत विद्यापीठातील अधिकारी / कर्मचारी यांना लागू असलेली विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परीक्षेमध्ये दिनांक ३१.०३.२०२१ रोजीच्या शासन निर्णयातील काही तरतुदीसह विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परिक्षेच्या नियमांमध्ये परिशिष्ट "अ" नुसार सुधारणा करणेच्या प्रस्तावास मा. कार्यकारी परिषदेच्या ३४२ व्या बैठकीत ठराव क्र.७३/का.प.बै.३४२ (०७.०१.२०२५) अन्वये मा. कुलगुरू महोदय मान्यता प्रदान करीत आहेत.**

स्वाक्षरीत/-

**(राजेंद्रकुमार पाटील)**
**कुलसचिव**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -**

१. मा. संचालक, संशोधन/ विस्तार शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

२. मा. अधिष्ठाता (कृषि) तथा संचालक शिक्षण, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी

३. सहयोगी अधिष्ठाता (सर्व)

४. विभाग प्रमुख (सर्व)

**कृ.मा.प.**

५. सहयोगी संशोधन संचालक (सर्व)

६. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय (सर्व)

७. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केंद्र/ प्रकल्प (सर्व).

८. नियंत्रक/ विद्यापीठ अभियंता/ विद्यापीठ ग्रंथपाल/ नियोजन अधिकरी, मफुकृवि, राहुरी.

९. उपकुलसचिव (प्रशासन)/ (विद्या), मफुकृवि, राहुरी

१०. अधिदान व लेखाधिकारी/ सहाय्यक नियंत्रक/सहाय्यक कुलसचिव (सर्व)

११. मा.कुलगुरु/ कुलसचिव यांचे स्वीय सहाय्यक, मफुकृवि, राहुरी

**प्रत माहितीस्तव-** मा.सहासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, १३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे -४

**(विजय त्र्यं. पाटील)**
**उप-कुलसचिव(प्रशासन)**

## परिशिष्ठ - अ

१. **सेवा प्रवेशोत्तर परिक्षेचा उद्देश :-** विद्यापीठ अधिकारी / कर्मचा-यास वरिष्ठ पदावर पदोन्नती देण्यापूर्वी, वरिष्ठ पदावर काम करण्यासाठीची क्षमता तपासण्यासाठी तसेच संबंधित कामकाजाचे ज्ञान प्राप्त आहे किंवा कसे याची पडताळणी करण्यासाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षेचे आयोजन करण्यात येते. त्यामुळे पदोन्नती देण्यासाठी सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील. (शा.नि. दिनांक ३१ मार्च २०२१)

२. विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेले विद्यापीठ निर्णय / परिपत्रकांन्वये ज्या पदांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आलेली आहे, तसेच ज्या पदांना सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणेपासून सूट देण्यात आलेली आहे, त्यामध्ये कोणताही बदल नाही.

३. विद्यापीठ परिपत्रक जा.क्र. / प्रशासन-ड / विसेप्रप / पदोन्नती / ३९२६ / २०२४, दिनांक १८.११.२०२४ अन्वये विद्यापीठामधील वर्ग-४ मधून लिपीक-नि-टंकलेखक या पदावर पदोन्नती झालेल्या कर्मचा-यांना वरिष्ठ लिपीक, सहाय्यक अधिक्षक, कार्यालय अधिक्षक व त्यापुढील पदांवर पदोन्नती देताना विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परीक्षा (PRE) उत्तीर्ण होणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

४. **सेवा प्रवेशोत्तर परीक्षेमध्ये सूट देणेबाबत :-** विद्यापीठ सेवेत अधिकारी / कर्मचा-याची १५ वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक किंवा त्याच्या वयाची ५० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक यापैकी जे नंतर घडेल त्यानंतर लगतचा दिनांक हा अधिकारी / कर्मचा-यास सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचा दिनांक समजण्यात यावा. (शा.शु. दिनांक ११ ऑगस्ट २०२२)

५. परीक्षा मराठी / इंग्रजीमध्ये प्रत्येक वर्षी वर्षातून एकदा घेण्यात येईल. (शा. नि. दिनांक ०६ जून १९७७)

६. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी संधी :-** उपरोक्त अ.क्र. २ व ३ सोडून विद्यापीठ अधिनस्त सर्व अधिकारी / कर्मचा-यांना संबंधित पदावर नियुक्तीच्या दिनांकापासून (सरळसेवा अथवा पदोन्नतीद्वारे नियुक्ती) एकूण तीन संधीमध्ये सेवा प्रवेशोत्तर परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक राहील.

तथापि, ज्या पदांना परिवीक्षा कालावधी लागू आहे, अशा पदावरील अधिकारी / कर्मचा-यांनी सदर परीक्षा परिवीक्षा कालावधीमध्येच उत्तीर्ण होणे आवश्यक राहील. (शा.नि. दिनांक ३१ मार्च २०२१)

७. **संधीची गणना :-** विद्यापीठ अधिकारी / कर्मचारी ज्या दिनांकास संबंधित पदावर रुजू होईल (सरळसेवा अथवा पदोन्नती नियुक्ती आदेश) त्या रुजू दिनांकानंतर ज्यावेळी सेवा प्रवेशोत्तर परिक्षेसाठी अर्ज सादर करण्याची कार्यवाही सुरु होईल, ती परीक्षा संबंधित अधिकारी / कर्मचा-याची पहिली संधी म्हणून गणण्यात येईल. तसेच, एखाद्या अधिकारी / कर्मचा-याने परीक्षेला बसण्यास पात्र असूनही परीक्षेचा अर्ज सादर केला नाही किंवा परीक्षेचा अर्ज सादर करुनही परीक्षेस उपस्थित राहिला नाही, तर ती परीक्षा संबंधित उमेदवाराची पहीली संधी म्हणून गणण्यात येईल. जर कोणत्याही कारणामुळे कोणत्याही वर्षी परीक्षा घेण्यात आली नाही तर ते वर्ष संधी मोजताना वगळण्यात येईल.
(शा. नि. दिनांक ०६ जून १९७७ व दिनांक ३१ मार्च २०२१)

८. **परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी किमान गुणांबाबतचे मानक :-** विद्यापीठ निर्णय क्र. एमटीजी-२(९२) / ३५७५ / ८२, दिनांक १४ जुलै १९८२ मधील क्र. ८ (४) प्रमाणे गुण दिले जातात ते खालीलप्रमाणे-

- विभाग उत्तीर्ण होण्यासाठी ५० गुणांपैकी कमीत कमी १७ गुण आवश्यक.
- पेपर उत्तीर्ण होण्यासाठी १०० गुणांपैकी कमीत कमी ४० गुण आवश्यक.
- फक्त एक विभाग उत्तीर्ण होण्यासाठी ५० गुणांपैकी कमीत कमी २५ गुण आवश्यक.

९. **ग्रेस मार्क :-** विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परीक्षेमध्ये प्रथम संधीमधील उमेदवार जर ग्रेस मार्क दिल्याने सर्व विषयांमध्ये तसेच परीक्षेमध्ये उत्तीर्ण होत असेल तर त्यास एकूण गुणांच्या १% म्हणजेच ०३ ग्रेस मार्क दिले जातील.

१०. **विहीत संधीमध्ये परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास होणारे परिणाम :-** विद्यापीठ अधिकारी / कर्मचारी विहीत संधीमध्ये उत्तीर्ण न झाल्यास, संबंधित अधिकारी / कर्मचा-याची वेतनवाढ रोखण्यात येईल. संबंधित अधिकारी / कर्मचारी ज्यावेळी परीक्षा उत्तीर्ण होईल किंवा त्यास सदरील परीक्षा उत्तीर्ण होण्यातून सूट प्राप्त होईल, त्यानंतर लगतच्या दिनांकास त्यास वेतनवाढ देय राहील. तथापि, वाढीव कालावधीची थकबाकीची रक्कम देय राहणार नाही. (शा. नि. दिनांक ३१ मार्च २०२१)

११. **पुर्नतपासणी तथा पुर्नमुल्यांकन :-** विभागीय परीक्षेबाबतच्या शासन निर्णयामध्ये / विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परीक्षेबाबतच्या नियमावलीमध्ये पुर्नतपासणी तसेच पुर्नमुल्यांकनाबाबत तरतूद नसल्याने उत्तरपत्रिकेची पुर्नतपासणी / पुर्नमुल्यांकन केले जाणार नाही.

१२. विद्यापीठ सेवा प्रवेशोत्तर परिक्षेच्या अभ्यासक्रमातील काही पुस्तके फक्त इंग्रजी तर काही पुस्तके फक्त मराठी भाषेमध्ये असल्यामुळे सदरील परीक्षेच्या पेपर / विभागामधील प्रश्नांची उत्तरे मराठी तसेच इंग्रजी भाषेमध्ये लिहीण्याची मुभा उमेदवारास राहील.

**(विजय त्र्यं. पाटील)**
**उपकुलसचिव (प्रशासन)**